
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 FEB 2022

लोकमत

# विद्यापीठात ध्वज फडकवून शिवाजी महाराजांना वंदन



शिवाजी विद्यापीठातील अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कुलगुरु डॉ. शिर्के यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन केले.

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवजयंतीनिमित्त शनिवारी शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वज फडकवून शिवाजी महाराजांना वंदन करण्यात आले. विद्यापीठाच्या प्रांगणातील अश्वारुढ पुतळ्यालाही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रतिमापूजनही करून एकमेकांना शिवजयंतीच्या शुभेच्छाही दिल्या. यानिमित्ताने विद्यापीठातील पुतळा परिसर विद्युत रोशणाईने न्हाऊन निघाले.

शनिवारी सकाळी साडेआठ वाजता झालेल्या या अभिवादन कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात अभिवादन

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाचा ध्वज फडकावून वंदन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. इतिहास अधिविभागातर्फे मुख्य इमारतीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमापूजनाचा कार्यक्रम झाला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, गजानन पळसे, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. पी. टी. गायकवाड, अभय जायभाये उपस्थित होते.

पुढारी

## शिवाजी विद्यापीठात शिवजयंती उत्साहात

शिवाजी विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्यासह परिसराला आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली.

शनिवारी सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाचा ध्वज फडकावून वंदन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. इतिहास अधिविभागाच्या वतीने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमापूजनाचा कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह सर्व अधिकाऱ्यांनी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व घटकांना शिवजयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 FEB 2022
लोकमत

# शिवराय हेच भारतीय आरमाराचे जनक

## डॉ. सुरेश शिखरे : शिवजयंतीनिमित्त विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्या राष्ट्रीय जाणिवेतून आणि गांभीर्यपूर्वक आरमाराची उभारणी केली, ती पाहता ते सर्वार्थाने भारतीय आरमाराचे जनक आहेत, असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ. सुरेश शिखरे यांनी केले. आरमाराच्या बळावर गब्बर झालेल्या सिद्दी, पोर्तुगीज या सागरी सत्तांच्या गुलामगिरीतून स्थानिकांची मुक्तता करणे, हाही एक प्रमुख उद्देश त्यांच्या आरमार निर्मितीमागे होता, अशी मांडणीही त्यांनी केली.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि जनसंपर्क कक्ष यांच्यातर्फे शनिवारी शिवजयंतीनिमित्त 'छत्रपती शिवाजी महाराज यांची आरमार नीती' या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. शिर्के म्हणाले, समुद्रावर स्वामित्व प्राप्त करून स्वराज्याचा व्यापार विस्तार आणि संरक्षण करण्याचे ध्येय सिद्धीस नेणाऱ्या महाराजांचे द्रष्टेपणच अधोरेखित होते.

20 FEB 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवराय हेच आरमाराचे जनक

## डॉ. सुरेश शिखरे : शिवजयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या राष्ट्रीय जाणिवेतून आणि गांभीर्यपूर्वक आरमाराची उभारणी केली, ती पाहता ते सर्वार्थाने भारतीय आरमाराचे जनक आहेत, असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ. सुरेश शिखरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी शिवजयंतीच्या निमित्ताने 'छत्रपती शिवाजी महाराज यांची आरमार नीती' या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. शिखरे म्हणाले, छत्रपती शिवरायांनी सागरी शक्तींना शह देऊन व्यापारी नियंत्रण प्राप्त करण्यासाठी सुरुवातीपासूनच पश्चिम किनारपट्टीवर बारीक लक्ष ठेवले होते. पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच आदी सागरी



संस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्या सत्ताधीशांना शह देऊन सागरी व्यापारावर नियंत्रण प्रस्थापित करावयाचे असेल, तर स्वतःचे सक्षम आरमार असले पाहिजे, ही जाणीव त्यांना होती. त्या दिशेने त्यांनी सातत्याने मोहिमांचे नियोजन केले. आरमाराच्या बळावर गब्बर झालेल्या सिद्दी, पोर्तुगीज या सागरी सत्तांच्या गुलामगिरीतून स्थानिकांची मुक्तता करणे, हाही एक प्रमुख उद्देश त्यांच्या आरमार निर्मितीमागे होता. जहाज बांधणी तंत्रज्ञान आणि आरमारी युद्धाचे कौशल्यज्ञान हे भारतातून लुप्त झाले होते. त्याचा शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांना पुनश्च परिचय करून दिला. अत्यंत विपरीत परिस्थितीतून महाराजांनी युरोपियनांच्या तोडीचे स्वतःचे आरमार निर्माण केले.

शिवरायांनी किल्ले व दुर्ग बांधणी करताना बाळगलेला शास्त्रीय दृष्टिकोन, त्यांचे स्थापत्यविषयक ज्ञान, स्वच्छतागृहे व शौचालयांची बांधणी करताना घेतलेली दक्षता हे पाहता महाराज हे एक थोर शास्त्रज्ञच होते.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, समुद्रावर स्वामित्व प्राप्त करून स्वराज्याचा व्यापार विस्तार आणि संरक्षण करण्याचे ध्येय बाळगून ते सिद्धीस नेणाऱ्या महाराजांचे द्रष्टेपणच त्यातून अधोरेखित होते. महाराजांचे हे द्रष्टेपण आणि गुण आत्मसात करण्याचा आपण प्रयत्न करण्याची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### स्त्रीदाक्षिण्य...धार्मिक सहिष्णुता...

शिवाजी महाराज जेव्हा बसरूरच्या मोहिमेवर आरमार घेऊन गेले होते, तेव्हा परतीच्या प्रवासात कारवारची बाजारपेठ लुटण्याचा त्यांचा मानस होता. नेमकी त्याचवेळी आदिलशहाची आई बडीबेगम ही मक्केला जाण्यासाठी काही खरेदी करण्यासाठी कारवार येथे आलेली होती. तेव्हा तिच्या संरक्षणासाठी सोबत आलेल्या शेरखान याने शिवाजी महाराजांची भेट घेऊन त्यांना कारवारवर स्वारी न करण्याविषयी विनंती केली. तेव्हा तेथील व्यापाऱ्यांकडून खंडणी देण्याच्या मोबदल्यात महाराजांनी आपल्या स्वारीचा बेत रद्द केला. शत्रूच्या आईलादेखील अभय देण्याच्या या प्रसंगातून महाराजांचे स्त्रीदाक्षिण्य तसेच धार्मिक सहिष्णुताही दिसून येते, असे डॉ. शिखरे यांनी सांगितले; मात्र त्याचवेळी बार्देश येथे स्थानिक नागरिकांना सक्तीने धर्मांतर करावयास लावणाऱ्या आणि धर्मांतर न करणाऱ्या नागरिकांचा शिरच्छेद करणाऱ्या जुलमी पोर्तुगीज पाद्र्याचा शिरच्छेद करायलाही महाराजांनी कमी केले नाही, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी स्वागत व परिचय करून दिला. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

20 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराज आरमाराचे जनक

## डॉ. सुरेश शिखरे; विद्यापीठात 'छत्रपती शिवाजी महाराज यांची आरमार नीती'वर व्याख्यान



डॉ. शिखरे

कोल्हापूर, ता. १९ :छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्या राष्ट्रीय जाणिवेतून आणि गांभीर्यपूर्वक आरमाराची उभारणी केली, ती पाहता ते सर्वार्थाने भारतीय आरमाराचे जनक आहेत, असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ. सुरेश शिखरे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त आयोजित'छत्रपती शिवाजी महाराज यांची आरमार नीती' विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

### स्त्रीदाक्षिण्य तसेच धार्मिक सहिष्णुता

शिवाजी महाराज बसरुरच्या मोहिमेवर असताना कारवारची बाजारपेठ लुटण्याचा त्यांचा मानस होता. त्याचवेळी आदिलशहाची आई बडी बेगम ही मक्केला जाण्यासाठी काही खरेदी करण्यासाठी कारवार येथे आली होती. तिच्या संरक्षणासाठी असलेल्या शेरखानाने महाराजांची भेट घेऊन त्यांना कारवारवर स्वारी न करण्याविषयी विनंती केली. महाराजांनी स्वारीचा बेत रद्द केला. शत्रूच्या आईलादेखील अभय देण्याच्या या प्रसंगातून महाराजांचे स्त्रीदाक्षिण्य तसेच धार्मिक सहिष्णुताही दिसून येते, असे डॉ. शिखरे यांनी सांगितले. मात्र, त्याचवेळी बार्देश येथे स्थानिक नागरिकांना सक्तीने धर्मांतर करावयास लावणाऱ्या आणि धर्मांतर न करणाऱ्या नागरिकांचा शिरच्छेद करणाऱ्या जुलमी पोर्तुगीज पाद्र्यांचा शिरच्छेद करायलाही महाराजांनी कमी केले नाही, असेही त्यांनी सांगितले.

'शिव-वार्ता' या यू ट्यूब वाहिनीवरून व्याख्यान प्रसारित केले.

डॉ. शिखरे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे सागरी शक्तींना शह देऊन व्यापारी नियंत्रण प्राप्त करण्यासाठी सुरुवातीपासूनच पश्चिम किनारपट्टीवर बारीक लक्ष होते. पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच या सागरी संस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्या सत्ताधीशांना शह देऊन सागरी व्यापारावर नियंत्रण प्रस्थापित करावयाचे असेल, तर स्वतःचे सक्षम आरमार असले पाहिजे, ही जाणीव त्यांना होती. त्या दिशेने त्यांनी सातत्याने मोहिमांचे नियोजन केले. आरमाराच्या बळावर गब्बर झालेल्या सिद्दी, पोर्तुगीज सागरी सत्तांच्या गुलामगिरीतून स्थानिकांची मुक्तता करणे, हाही एक प्रमुख उद्देश त्यांच्या आरमार निर्मितीमागे होता.'

ते म्हणाले, 'समाजात सिंधुबंदीची मानसिकता खोलवर रुजलेली असतानाही त्यावर मात करीत महाराजांनी नेटकेपणाने आरमारनिर्मितीचे कार्य हाती घेतले आणि त्यामध्ये सर्व समाजघटकांचे सहकार्यही घेतले. महाराजांनी पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच आदी टोपेकरांशी कसे वागावे, हे एका आज्ञापत्रातूनच बारकाईने स्पष्ट केले होते.'